भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४

(१९१४ चा अधिनियम क्रमांक ९)

[१ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Local Authorities Loans Act, 1914

## (Act No. 9 of 1914)

[As in force on 1st October, 1977]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[किंमत ४० पैसे]

# स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४

## कलमांचा क्रम

प्रास्ताविका

कलमे.

१. संक्षिप्त नाव व विस्तार.

२. व्याख्या.

३. स्थानिक प्राधिकरणांच्या कर्जे काढण्याच्या शक्ती.

४. शासनाची नियम करण्याची शक्ती.

५. कर्जाची परतफेड न झाल्यास जप्तीचा उपाय.

६. अल्पमुदतीची विनियमपत्रे पुरःसृत करणे.

७. या अधिनियमाखाली असेल त्याखेरीज अन्य रीतीने कर्जयोजना पार पाडावयाची नाही.

८. ५ सप्टेंबर, १८७१ च्या अगोदर अस्तित्वात असणाऱ्या कर्जांना अधिनियम लागू करणे.

पहिली अनुसूची

दुसरी अनुसूची

(म.ब) एच् ४८२१ (१०५५—५-१९७८)

# स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४

## (१९१४ चा अधिनियम क्रमांक ९)[१]

[ २८ फेब्रुवारी, १९१४ ]

**स्थानिक प्राधिकरणांना कर्जे मंजूर करण्यासंबंधीचा कायदा एकत्रित आणि विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** स्थानिक प्राधिकरणांच्या कर्ज काढण्याच्या शक्तींसंबंधीचा कायदा एकत्रित आणि विशोधित करणे समयोचित आहे ; त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व विस्तार.

१. (१) या अधिनियमाला 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' असे म्हणता येईल.

[२][ (२) [३][ १ नोव्हेंबर, १९६६ च्या लगतपूर्वी भाग ख राज्यांमध्ये जी समाविष्ट होती ती राज्यक्षेत्रे ] खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे. ]

व्याख्या.

२. या अधिनियमात "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, जी व्यक्ती कोणत्याही स्थानिक निधीचे किंवा नगरपालिका निधीचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करण्यास विधितः हक्कदार असते किंवा कोणत्याही स्थानिक क्षेत्रांमध्ये कोणताही उपकर, पट्टी, शुल्क किंवा कर बसवण्यास विधितः हक्कदार असते अशी व्यक्ती असा आहे;

"निधी" हा शब्द कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या संदर्भात वापरला असता त्यामध्ये, ज्याचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करण्यास असे प्राधिकरण विधितः हक्कदार असते अशा कोणत्याही स्थानिक निधीचा किंवा नगरपालिका निधीचा आणि जो बसवण्यास असे प्राधिकरण विधितः हक्कदार असते असा उपकर, पट्टी, शुल्क किंवा कर यांचा आणि अशा प्राधिकरणाचे ठायी निहित असलेल्या कोणत्याही संपत्तीचा समावेश होतो;

"विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे आणि "काम" यामध्ये सर्वेक्षणाचा समावेश होतो-मग ते अन्य कोणत्याही कामाला आनुषंगिक असो वा नसो;

[४][ "शासन" किंवा "समुचित शासन" याचा कटक प्राधिकरणाच्या आणि मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणांच्या संबंधातील अर्थ, केंद्र शासन असा आहे आणि अन्य स्थानिक प्राधिकरणांच्या संबंधातील अर्थ, राज्य शासन असा आहे. ]

स्थानिक प्राधिकरणांच्या कर्ज काढण्याच्या शक्ती.

३. (१) स्थानिक प्राधिकरणाला विहित शर्तींच्या अधीनतेने पुढीलपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता आपल्या निधींच्या किंवा त्याच्या काही भागाच्या प्रतिभूतीवर कर्जे काढता येतील, ती प्रयोजने अशी :—

(एक) जी कामे करण्यास ते विधितः प्राधिकृत असेल अशी कामे पार पाडणे;

(दोन) दुष्काळाच्या किंवा टंचाईच्या प्रसंगी सहाय्य देणे आणि संकटनिवारणाची कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे;

(तीन) कोणत्याही घातक साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव किंवा फैलाव होण्यास प्रतिबंध करणे;

(चार) खंड (दोन) आणि (तीन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनांशी निगडित असेल किंवा त्यास सहाय्यभूत ठरेल अशा कोणत्याही उपाययोजना;

(पाच) कायद्यानुसार अगोदर कर्जाऊ घेतलेल्या पैशांची परतफेड करणे :

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १९१४, भाग पाच, पृ. ५; प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा—कित्ता, १९१४—भाग पाच, पृष्ठ १७; आणि परिषदेतील कामकाजाकरिता पहा—कित्ता, १९१४—भाग सहा, पृष्ठे ६४, १५९, १८९ व ४९६.

हा अधिनियम मध्य प्रांताला लागू करताना 'स्थानिक प्राधिकरण कर्जे (मध्य प्रांत विशोधन) अधिनियम, १९२२' (१९२२ चा मध्य प्रांत अधिनियम १) याद्वारे विशोधित करण्यात आला आहे.

वऱ्हाड विधी अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) याद्वारे तो वऱ्हाडवर अंशतः विस्तारित करण्यात आला आहे.

[२] अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पोट-कलम (२) ऐवजी घातले.

[३] विधि अनुकूलन आदेश (क्र. २) १९५६ द्वारे "भाग ख राज्ये" या मजकुराऐवजी घातले.

[४] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे घातले.

परंतु, खंड (पाच) खाली कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेची परतफेड करण्यासाठी ठरवावयाचा कालावधी अगोदर कर्जाऊ घेतलेल्या रकमेच्या परतफेडीसाठी निश्चित केलेला कालावधी हिशेबात घेता, त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमितीद्वारे किंवा त्याखाली कर्जाच्या परतफेडीसाठी निश्चित केलेल्या कमाल कालावधीपेक्षा अधिक होत असेल तर, त्या खंडातील कोणत्याही गोष्टीमुळे स्थानिक प्राधिकरणाला असा कालावधी निश्चित करण्याची शक्ती प्रदान होते असे मानण्यात येणार नाही :

[१][ परंतु आणखी असे की, [२][ समुचित शासनाने ] दिलेल्या कर्जाहून अन्य कर्जांच्या बाबतीत, पंचवीस लाख रुपयांहून अधिक रकमेचे कर्ज, ती कर्जयोजना प्रसृत करण्याच्या दिनांकासहित अशा कर्जाच्या सर्व अटी [३][ समुचित शासनाने ] मान्य केल्याशिवाय काढण्यात येणार नाही. ]

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतेही स्थानिक प्राधिकरण---

(क) ज्या कोणत्याही प्रयोजनासाठी आपल्या निधीचे उपयोजन करण्यास त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली ते प्राधिकृत नाही अशा कोणत्याही प्रयोजनासाठी पैसे कर्जाऊ घेण्यास किंवा खर्च करण्यास, किंवा

(ख) बारा महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीत प्रदेय असलेल्या पुर:सृत विपत्रांच्या किंवा वचनचिठ्ठयांच्या साहाय्याने पैसे कर्जाऊ घेण्यास,

प्राधिकृत होते असे मानले जाणार नाही.

**शासनाची नियम करण्याची शक्ती.**

४. (१) [४][ समुचित शासनाला ] पुढील गोष्टींबाबत या अधिनियमाशी सुसंगत असे नियम [५] करता येतील, त्या अशा---

(एक) ज्यांच्या प्रतिभूतीवर पैसा कर्जाऊ घेता येईल अशा निधींचे स्वरूप;

(दोन) ज्या कामासाठी पैसा कर्जाऊ घेता येईल अशी कामे;

(तीन) पैसा कर्जाऊ घेण्याच्या परवानगीसाठी अर्ज करण्याची पद्धती;

(चार) अशा कर्जांच्या संबंधात करावयाच्या चौकशा आणि अशा चौकशा करण्याची पद्धती;

(पाच) कोणत्या बाबतीत व कोणत्या नमुन्यात अर्ज आणि त्यावरील कार्यवाही व आदेश यांचा तपशील प्रकाशित केला जाईल;

(सहा) कोणत्या बाबतीत [६][ समुचित शासन ] [७] * * * कर्ज देऊ शकेल;

(सात) [८][ कोणत्या बाबतीत स्थानिक प्राधिकरणे समुचित शासन सोडून अन्य व्यक्तींकडून कर्जे काढू शकतील; ]

(आठ) ज्या शर्तींवर रक्कम कर्जाऊ घ्यावयाची अशा शर्ती नमूद करण्याची आणि त्यांचे पालन करवून घेण्याची पद्धती;

(नऊ) कर्जे देण्याची किंवा उभारण्याची पद्धती आणि वेळ;

(दहा) कर्जांच्या सहाय्याने केल्या जाणाऱ्या कोणत्याही कामांचे निरीक्षण;

(अकरा) कर्जाची परतफेड हप्तेबंदीने करावयाची असल्यास ती ज्या हप्त्यांनी केली जाणार ते हप्ते, कर्जावर आकारावयाचे व्याज आणि कर्जाची परतफेड करण्याची आणि त्यावर व्याज देण्याची पद्धती आणि वेळ;

(बारा) जे निधी कर्जाबद्दलची प्रतिभूती होणार त्यांवर, कर्जयोजना पार पाडण्याकरता आलेला खर्च म्हणून आकारावयाची रक्कम;

(तेरा) अशा निधींची जप्ती करणे, आणि त्यांची विल्हेवाट लावण्याची किंवा उगराणी करण्याची पद्धती;

(चौदा) कर्जांच्या संबंधात ठेवावयाचे हिशेब;

(पंधरा) कर्जापैकी खर्च न झालेल्या शिल्लक रकमेचा स्थानिक प्राधिकरणाच्या ऋणामध्ये कोणत्याही प्रकारे घट करण्यासाठी किंवा ते प्राधिकरण जी कामे करण्यास विधित: प्राधिकृत आहे अशी कोणतीही कामे करण्यासाठी विनियोग; आणि असा विनियोग करण्यास आवश्यक ती मंजुरी;

आणि या अधिनियमाची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या अन्य सर्व बाबी.

---

[१] "प्रक्रांति अधिनियम, १९२०" (१९२० चा ३८) कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे हे परंतुक घालण्यात आले.

[२] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे स्थानिक शासनाच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घालण्यात आला.

[३] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे गव्हर्नर जनरल इन कौन्सिल याच्या उल्लेखाऐवजी घालण्यात आला.

[४] १९२० चा अधिनियम ३८, कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे गव्हर्नर जनरल इन कौन्सिल याच्या उल्लेखाऐवजी स्थानिक शासनाचा उल्लेख घालण्यात आला व अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे त्याऐवजी वरील उल्लेख घालण्यात आला.

[५] चीफ कमिशनर प्रांतांमधील सर्व स्थानिक प्राधिकरणे आणि गव्हर्नर प्रांतांमधील कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांतील बंदर प्राधिकरणे यांना लागू होणाऱ्या नियमांकरिता पहा---

स्थानिक प्राधिकरण (मध्यवर्ती) नियम, १९३७ (जनरल आर अँड ओ, पुरवणी खंड ६, पृष्ठ ४०७); आणि गव्हर्नर प्रांतांमधील इतर प्राधिकरणांना लागू होणाऱ्या नियमांकरिता पहा--स्थानिक प्राधिकरण कर्ज नियम, १९१५ (जनरल आर अँड ओ-खंड ४, पृष्ठ ५०४).

[६] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे स्थानिक शासनाच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घालण्यात आला.

[७] "प्रकांति अधिनियम, १९२०" (१९२० चा ३८) कलम २ व पहिली अनुसूची याद्वारे विवक्षित शब्द निरसित करण्यात आला.

[८] कित्ता---कलम २ व पहिली अनुसूची द्वारे मूळ खंडाऐवजी घातले.

[1]* * * *

(३) या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम[2] ***[3][शासकीय राजपत्रात] प्रकाशित करण्यात येतील आणि अशा प्रकाशनानंतर, जणू काही ते या अधिनियमामध्ये अधिनियमित केलेले असावेत त्याप्रमाणे अंमलात येतील.

**कर्जाची परतफेड न झाल्यास जप्तीचा उपाय.**

५. जर या अधिनियमाच्या उपबंधांनुसार कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम किंवा त्याच्या संबंधात देय असलेले कोणतेही व्याज किंवा खर्च यांची त्या कर्जाच्या शर्तींनुसार परतफेड करण्यात आली नाही तर, [4][समुचित शासन] स्वतःच कर्जदाता असल्यास ते ज्याच्या प्रतिभूतीवर कर्ज देण्यात आले होते तो निधी जप्त करील आणि [4][समुचित शासन] कर्जदाता नसल्यास कर्जदात्याच्या अर्जावरून ते तसे करू शकेल. अशा जप्तीनंतर, [4][समुचित शासनाने] या बाबतीत नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे या जप्त केलेल्या निधीबाबत व्यवहार करता येणार नाही; पण असा अधिकारी अशा निधीच्या संबंधात, जप्ती आली नसती तर कर्जदाराला ज्या कृती करता आल्या असत्या त्या सर्व कृती करू शकेल आणि कर्जाची व त्या कर्जाच्या संबंधात प्रदेय असलेले सर्व व्याज व खर्च यांची आणि जप्ती व तदनंतरची कार्यवाही यांमुळे झालेला सर्व खर्च यांच्या परतफेडीसाठी सर्व उत्पन्न उपयोजित करू शकेल:

**पूर्वीचे विधितः निर्माण केलेले प्रभार जप्तीमुळे शून्य ठरावयाचे नाहीत.**

परंतु, जप्त केलेले निधी कायद्यानुसार अगोदरच ज्या ऋणाबद्दल तारण ठेवले होते असे कोणतेही ऋण अशा जप्तीमुळे शून्य होणार नाही किंवा त्याला बाध येणार नाही; पण असे सर्व पूर्व प्रभार, ज्याच्या-संबंधात अशी जप्ती आणली त्या दायित्वाच्या पूर्तीसाठी उत्पन्नाचा कोणताही भाग उपयोजित केला जाण्यापूर्वी त्या उत्पन्नातून चुकते केले जातील.

**अल्प मुदतीची विनिमयपत्रे पुरःसृत करणे.**

६. (१) 'भारतीय कागदी चलन अधिनियम, १९१०' (१९१० चा दोन)[5]---कलम २६ च्या उप-बंधांच्या अधीनतेने, पहिल्या अनुसूचीमध्ये उल्लेखलेली स्थानिक प्राधिकरणे आणि [6][समुचित शासन] (**शासकीय राजपत्रातील**) अधिसूचनेद्वारे ज्या स्थानिक प्राधिकरणावर या कलमाच्या उपबंधांचा विस्तार करील असे अन्य कोणतेही स्थानिक प्राधिकरण [6][समुचित शासनाच्या] पूर्वमंजुरीने, ज्या प्रयोजनासाठी अशा स्थानिक प्राधिकरणाला त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली विधितः पैसे कर्जाऊ घेता येतील अशा कोणत्याही प्रयोजनासाठी, बारा महिन्यांहून अधिक नाही इतक्या कालावधीत प्रदेय असतील अशी विनिमयपत्रे किंवा वचनपत्रे पुरःसृत करून पैसे कर्जाऊ घेता येतील:

परंतु, याप्रमाणे पुरःसृत केली असतील अशी विनिमयपत्रे किंवा वचनपत्रे यांची रक्कम, अशा स्थानिक प्राधिकरणाने त्या त्या काळी कर्जाऊ घेतलेल्या अन्य रकमा विचारात घेता, अशा स्थानिक प्राधिकरणाला एकूण जितकी रक्कम कर्जाऊ घेण्याची शक्ती विधितः प्रदान झाली असेल त्या रकमेपेक्षा जास्त असता नये.

(२) ज्या शर्तींवर या अधिनियमाखाली पैसे कर्जाऊ घेता येतील किंवा त्यांची परतफेड करता येईल त्या शर्तींचे [6][समुचित शासनाला] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनियमन करता येईल.

**या अधिनियमाखाली असेल त्याखेरीज अन्य रीतीने कर्जयोजना पार पाडावयाची नाही.**

७. या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही कोणतेही स्थानिक प्राधिकरण कोणत्याही प्रयोजनासाठी, आपल्या निधींच्या तारणावर पैसे कर्जाऊ घेणार नाही किंवा ते निधी अन्यथा प्रभारित करणार नाही; आणि हा अधिनियम पारित झाल्यानंतर त्या प्रयोजनासाठी अन्यथा केलेली कोणतीही संविदा शून्य असेल:

परंतु, यामध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे,---

(क) कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला, सध्या किंवा यापुढे अंमलात असलेल्या कोणत्याही विशेष अधिनियमितीद्वारे त्याला प्रदान करण्यात आलेल्या कर्ज काढण्याच्या शक्तींचा वापर करण्यापासून प्रतिबंध होतो, किंवा

---

[1] 'प्रकांति अधिनियम, १९२०' (१९२० चा ३८) कलम २ व पहिल्या अनुसूचीद्वारे पोट-कलम (२) निरसित करण्यात आले.

[2] कित्ता---द्वारे विवक्षित शब्द निरसित करण्यात आला.

[3] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "स्थानिक अधिकृत राजपत्रात" याऐवजी घातले.

[4] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे स्थानिक शासनाच्या उल्लेखाऐवजी घातले.

[5] हा अधिनियम भारतीय कागदी चलन अधिनियम, १९२३ (१९२३ चा १०) याद्वारे निरसित करण्यात आला व त्यानंतर तोही रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अधिनियम, १९३४ (१९३४ चा २) याद्वारे निरसित करण्यात आला: आता त्या अधिनियमाचे कलम ३१ पहा.

[6] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलच्या उल्लेखाऐवजी हा उल्लेख घातला.

[7] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गॅझेट ऑफ इंडीयामधील" याऐवजी घालण्यात आले.

(ख) ज्या प्रयोजनासाठी स्थानिक प्राधिकरणाचे निधी विधित: उपयोजित करता येतात अशा कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोजित करावयाच्या पैशांवरील व्याजाच्या प्रदानाची हमी देऊन, आपले निधी प्रभारित करण्याची जी शक्ती अशा कोणत्याही अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आली असेल तिच्यावर परिणाम होतो,

असे मानले जाणार नाही.

५ सप्टेंबर, १८७१ च्या अगोदर अस्तित्वात असणाऱ्या कर्जांना अधिनियम लागू करणे.

[1][८. पाच सप्टेंबर, १८७१ या दिवसापूर्वी कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला स्टेट-इन-कौन्सिलच्या सचिवाने कर्जाऊ दिलेली कोणतीही रक्कम आणि अशा रकमेवर देय असलेले व्याज यांच्या वसुलीसाठी कलम ५ मध्ये उल्लेखिलेला उपाय उपलब्ध असेल.]

९. [निरसने] निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२) क. २ आणि अनुसूचीद्वारे निरसित.

---

## पहिली अनुसूची

(कलम ६ पहा)

कलकत्ता महानगरपालिका
आयुक्त, कलकत्ता बंदर.

[2]* * * * *

मुंबई शहराची महानगरपालिका.

मुंबई बंदराचे विश्वस्त.

मद्रास महानगरपालिका.

मद्रास बंदराचे विश्वस्त.

मुंबई शहर सुधारणा विश्वस्त.

कलकत्ता शहर सुधारणा विश्वस्त.

[3]* * * * * *

[4]* * * * * *

---

## दुसरी अनुसूची

[अधिनियमिती निरसित.]

निरसन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १२) क. २ व अनुसूचीद्वारे निरसित.

---

[1] अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

[2] चितगाव बंदराच्या आयुक्तांसंबंधीची नोंद अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे निरसित करण्यात आली.

[3] रंगूनची नगरपालिका समिती व रंगून बंदराचे आयुक्त या संबंधीच्या नोंदी अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे निरसित करण्यात आल्या.

[4] कराची नगरपालिका व कराची बंदराचे विश्वस्त यासंबंधीच्या नोंदी अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे निरसित करण्यात आल्या.

## THE LOCAL AUTHORITIES LOANS ACT, 1914

## स्थानिक प्राधिकरण कर्ज अधिनियम, १९१४

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| borrowing power | .. कर्ज काढण्याची शक्ती | .. [S. 3—m. n.] |
| borrow money | .. पैसे कर्जाऊ घेणे | .. [S. 3 (2) (b)] |
| borrow upon | .. –च्या तारणावर कर्ज काढणे | .. [S. 7] |
| charge | .. प्रभार | .. [S. 5—proviso] |
| effect a loan | .. कर्जयोजना पार पाडणे | .. [S. 4 (1) (xii)] |
| establishment and maintenance of relief works | संकटनिवारणाची कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे | .. [S. 3 (1) (ii)] |
| floatation of loan | .. कर्जयोजना प्रसृत करणे | .. [S. 3—2nd proviso] |
| funds | .. निधी | .. [S. 2—2nd para.] |
| local authority | .. स्थानिक प्राधिकरण | .. [S. 2] |
| local or municipal fund | .. स्थानिक निधी किंवा नगरपालिका निधी | .. [S. 2-2nd para.] |
| make a loan | .. कर्ज देणे | .. [S. 4 (1) (vi)] |
| work | .. काम | .. [S. 2—3rd para.] |

## स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४

## THE LOCAL AUTHORITIES LOANS ACT, 1914

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| कर्ज काढण्याची शक्ती | borrowing power | .. [S. 3—m. n.] |
| कर्ज देणे | make a loan | .. [S. 4 (*1*) (*vi*)] |
| कर्ज योजना पार पाडणे | effect a loan | .. [S. 4 (*1*) (*xii*)] |
| कर्जयोजना प्रसृत करणे | floatation of loan | .. [S. 3—2nd proviso] |
| काम | work | .. [S. 2—3rd para.] |
| ——च्या तारणावर कर्ज काढणे | borrow upon | .. [S. 7] |
| निधी | funds | .. [S. 2—2nd para.] |
| पैसे कर्जाऊ घेणे | borrow money | .. [S. 3 (*2*) (*b*)] |
| प्रभार | charge | .. [S. 5—proviso] |
| संकटनिवारणाची कामे सुरू करणे व ती चालू ठेवणे | establishment and maintenance of relief works | [S. 3 (*1*) (*ii*)] |
| स्थानिक निधी किंवा नगरपालिका निधी | local or municipal fund | .. [S. 2—2nd para.] |
| स्थानिक प्राधिकरण | local authority | .. [S. 2] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

## स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४—महाराष्ट्र विशोधन अधिनियम

### स्थानिक प्राधिकरण कर्जे (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४२

(१९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २)

'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९४२' हा मुंबई प्रांतास लागू करताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' (१९१४ चा ९) हा मुंबई प्रांतास लागू करताना त्यामध्ये सुधारणा करणे समयोचित आहे ;

आणि ज्याअर्थी, 'भारत शासन अधिनियम, १९३५'-कलम ३५ खाली दिनांक ४ नोव्हेंबर, १९३९ रोजी मुंबईच्या गव्हर्नरांनी जाहीरनामा काढून, उक्त अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली प्रांतिक विधानमंडळामध्ये निहित केलेल्या सर्व शक्ती गव्हर्नरांनी स्वत:कडे घेतलेल्या आहेत ;

त्याअर्थी, उक्त शक्तींचा वापर करून मुंबईचे गव्हर्नर पुढील अधिनियम करीत आहेत :—

**१.** या अधिनियमास 'स्थानिक प्राधिकरण कर्जे (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९४२' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

**२.** 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' (१९१४ चा ९) मुंबई प्रांतास लागू करताना त्याच्या कलम ७ मधील परंतुकाच्या खंड (ख्) नंतर खालीलप्रमाणे मजकूर समाविष्ट करण्यात येईल, तो असा :— १९१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ७ मध्ये सुधारणा करणे.

"किंवा

(ग्) 'मुंबई स्थानिक मंडळे अधिनियम, १९२३' (१९२३ चा मुंबई अधिनियय ६)-कलम ४ खाली घटित केलेल्या कोणत्याही जिल्हा स्थानिक मंडळास उक्त अधिनियमाच्या कलम ९३-पोटकलम (१) खाली बसवलेल्या, परंतु उक्त कलमाच्या पोटकलम (२) खाली ज्याची उगराणी झालेली नाही किंवा ज्याची उगराणी स्थगित केलेली आहे अशा उपकराच्या रकमेइतके अग्रिम मुंबई शासनाकडून मिळवण्यास प्रतिबंध होतो, ".

### स्थानिक प्राधिकरण कर्जे (महाराष्ट्र एकरूपता व सुधारणा) अधिनियम, १९७५

(१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१)

महाराष्ट्र राज्यातील (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे यांहून अन्य) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्यासंबंधीच्या कायद्यांमध्ये एकरूपता आणण्यासाठी उपबंध करणे आणि या व अन्य विवक्षित प्रयोजनार्थ 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' यामध्ये सुधारणा करणे यांसाठी अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे यांहून अन्य) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्यासंबंधीच्या कायद्यांमध्ये एकरूपता आणण्यासाठी उपबंध करणे आणि या व अन्य विवक्षित प्रयोजनार्थ 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' यामध्ये सुधारणा करणे समयोचित आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास 'स्थानिक प्राधिकरण कर्जे (महाराष्ट्र एकरूपता व सुधारणा) अधिनियम, १९७५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** महाराष्ट्र राज्यातील (कटक प्राधिकरणे व मोठ्या बंदरांमधील बंदर प्राधिकरणे यांहून अन्य) स्थानिक प्राधिकरणांना कर्जे देण्यासंबंधीच्या कायद्यांमध्ये एकरूपता आणण्यासाठी उपबंध करण्याच्या प्रयोजनार्थ, 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' याचे (कलम ८ व्यतिरिक्त) उपबंध आणि त्याखाली केलेले नियम हे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रामध्ये जसे अंमलात होते तसे ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अंमलात येतील; आणि त्यानुसार— १९१४ चा अधिनियम ९ याची महाराष्ट्र राज्यात एकरूपता व परिणामरूप उपबंध.

(क्) 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' व त्या अधिनियमाखाली केलेले व राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेले नियम यांमध्ये 'स्थानिक प्राधिकरण कर्जे (मध्यप्रांत व वऱ्हाड सुधारणा) अधिनियम, १९२२' याद्वारे केलेली सुधारणा त्या प्रदेशात ती लागू करताना (केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल त्याशिवाय) अंमलात असण्याचे बंद होईल व निरसित होईल; आणि

(ख्) 'स्थानिक प्राधिकरण कर्जे आईन-१३५२, फसली' व त्या आईनखाली केलेले व महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रात अंमलात असलेले नियम हे (केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल त्याशिवाय) निरसित होतील.

(शा.म.मु.) एच ४८७१ (१,०५५—११-७९)

१९१४ चा अधिनियम ९, याच्या कलम १ ची सुधारणा.

३. या अधिनियमाच्या कलम २ खाली उपबंधित केल्याप्रमाणे, 'स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४' (त्याचा निर्देश यापुढे "मुख्य अधिनियम" असा केला आहे) संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू करताना, उक्त अधिनियमाच्या कलम १-पोटकलम (२) मधील "१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग 'ख' मध्ये समाविष्ट असलेली" या मजकुरानंतर "महाराष्ट्र राज्यातील हैद्राबाद क्षेत्राखेरीज इतर" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१९१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३-पोटकलम (१)-खंड (पाच) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(सहा) तात्पुरत्या अकल्पित वित्तीय अडचणीच्या बाबतीत, आपल्या आस्थापनेचा खर्च भागवणे ;

(सात) ज्याकरिता या कलमात आधीच तरतूद केलेली नसेल असा तातडीचा व अकल्पित स्वरूपाचा कोणताही अपवादात्मक खर्च भागवणे :".

१९१४ चा अधिनियम ९ याच्या कलम ७ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७ च्या परंतुकातील खंड (क्) ऐवजी पुढील खंड घालण्यात येईल :—

"(क्) 'महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१' याखाली योग्य रीत्या घटित केलेल्या कोणत्याही जिल्हा परिषदेस, त्या अधिनियमाच्या कलम १५४ खाली ज्याची उगराणी करण्यात आलेली नाही किंवा ज्याची उगराणी स्थगित ठेवण्यात आलेली आहे अशा, उक्त अधिनियमाच्या १४४, १५१ व १५२ या कलमांखाली बसवण्यात येणाऱ्या उपकराच्या रकमेइतके अग्रिम राज्य शासनाकडून मिळण्यास प्रतिबंध होतो.".

व्यावृत्ती.

६. (१) 'स्थानिक प्राधिकरण कर्जे, आईन-१३५२, फसली' हा महाराष्ट्र राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रास लागू करताना, त्याच्या उपबंधांनुसार किंवा त्यांखाली व या अधिनियमाच्या कलम २ खाली निरसित केलेल्या 'स्थानिक प्राधिकरण कर्जे (मध्यप्रांत व वऱ्हाड विशोधन) अधिनियम, १९२२' द्वारे सुधारणा केलेल्या व मुख्य अधिनियमाच्या उपबंधांनुसार (कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला दिलेली किंवा अशा प्राधिकरणाने उभारलेली कोणतीही कर्जे धरून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम उपबंधांनुरूप केली असल्याचे मानण्यात येईल व मुख्य अधिनियमानुसार केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा कोणत्याही कार्यवाहीद्वारे तीमध्ये फेरफार करण्यात येईपर्यंत, ती निरसित करण्यात येईपर्यंत किंवा तीमध्ये सुधारणा करण्यात येईपर्यंत, त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

(२) या अधिनियमाच्या संबंधात, पोटकलम (१) मधील विशिष्ट बाबींच्या उल्लेखामुळे 'मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४' (जो निरसनाच्या परिणामांशी संबंधित आहे) याच्या कलम ७ च्या सर्वसाधारण प्रयुक्तीवर परिणाम होणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई